**Historicity Research Journal**
**Volume 2 | Issue 7 | March 2016**

**Impact Factor : 0.4521(UIF)**
**ISSN:- 2393-8900**

**Research Article**

# *"ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले"*

***सुहास मुरलीधर उघडे***

सहा. प्राध्यापक, मराठी विभाग, वसुंधरा कला व विज्ञान महाविद्यालय,
जुळे सोलापूर, सोलापूर.

***प्रस्तावना –***

मानवाने आपले जीवन सुखकर व्हावे म्हणून रानटी अवस्थेपासून विविध शोध लावले आणि व्यवस्था निर्माण केल्या. समाज व्यवस्थेचा विचार केला तर भारतीय समाज व्यवस्था पुरूष प्रधान आहे. त्यामुळे येथील विचारसरणी पुरूषांना प्राधान्य देऊन स्त्रियांना दुय्यम स्थान देणारी अशीच आहे. वास्तविक पाहता स्त्री–पुरूषांमध्ये निसर्गाने भेद केला आहे, हे मान्यच आहे. परंतु स्त्रियांना संधी दिली अनुकुल वातावरण दिले तर त्या देखील पुरूषाप्रमाणेच नव्हे तर त्याचेपेक्षा उत्तम कार्य करून यश संपादन करू शकतात, मग क्षेत्र राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक कोणतेही असो.

एखादी सुंदर इमारत पाहिल्यावर आपण तिच्या दृश्यरूपाची स्तुती करतो. परंतु ती इमारत ज्या पायावर उभी आहे, त्याबद्दल आपण कोणीच चकार शब्द उच्चारत नाही. अशाच प्रकारचे अतुलनिय शैक्षणिक कार्य करणाऱ्या माता सावित्रीबाई फुलेंची स्थिती आहे.

शिक्षणाचे माहेरघर, पुण्यनगरी म्हणून पुणे शहराचा गौरव केला जातो. त्याच पुण्यात पेशवाईच्या काळात अज्ञानाचा अंधःकार होता. स्त्रिया आणि शुद्रांचे माणूसपण नाकारले होते. ब्राम्हण पुरूषाखेरीज कुणीही शिक्षण घेत नसे ही धर्माज्ञा होती. धर्मसत्ता व राजसत्ता ब्राम्हण जातीच्या हाती एकवटली होती. शुद्रांच्या शिकण्याने धर्मभ्रष्ट होतो. देवाचे आरिष्ट ओढवले जाते, परिणामी दुष्काळ पडतो. अशा अंधश्रध्दा सोयीस्करपणे पसरविल्या जाऊन जोपासल्या जात होत्या. स्त्रियांची स्थिती तर खूपच बिकट होती. समाज व्यवस्थेने तिला गुलाम बनविले होतेच त्याच बरोबर तिने बंड करू नये याची पुरेपुर खबरदारी घेतली होती. या व्यवस्थेने काही स्त्रियांचा गौरव केला त्या कोणत्या ? "असूर्यपशा" म्हणजे काय ? तर जिला चुकूनही सूर्यदर्शन घडत नाही ती स्त्री होय. अशा सभोवतालच्या सामाजिक पर्यावरणात स्त्री शिक्षण म्हणजे दिवास्वप्नच होय. परंतु केवळ समाज उन्नतीसाठीच आयुष्य खर्च करावयाचे असा निर्धार करून मोठ्या आत्मविश्वासाने फुले दांपत्याने स्त्री शिक्षण, विधवा विवाह, विधवा गृह, अनाथ बालगृह, अस्पृश्यता निवारण आदी कार्य करून समाजाची निःस्वार्थ सेवा केली.

पुण्यापासून अवघ्या 30–35 मैलावर सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यामध्ये नायगाव. या गावची पाटीलकी खंडोजी नेवसे पाटील यांच्याकडे होती. ते गावचा न्यायनिवाडा करीत, गरजूंना मदत करणे हे आपले आद्यकर्तव्य आहे असे ते समजत. त्यांचे पहिले कन्यारत्न "सावित्री" जन्म 3 जानेवारी 1831. सिध्दू, सखाराम आणि श्रीपती ही भावंड सावित्रीमाईना समाज व्यवस्थेतील दबलेल्या, पिचलेल्या वर्गाचे दर्शन वडिलांच्या न्यायनिवाड्याचे कामामुळे जवळून घेता आले. वडिलांमुळेच त्यांना नेतृत्व गुण मिळाले. तत्कालीन परंपरेनुसार त्यांचा विवाह ज्योतिबा फुले यांचेशी झाला.

ज्योतिबांची आई त्यांच्या बालपणीच वारल्यामुळे त्यांची मावस बहिण सगुणाबाई हिने त्यांचा सांभाळ केला. ज्योतिबांनी जेमतेम प्राथमिक शिक्षण घेतले. त्याचवेळी धर्ममार्तंडांनी गोविंदरावांना दटावून ज्योतिबांचे शिक्षण बंद करावयास भाग पाडले. परंतु ज्योतिरावांच्या मेंदूत जागृत झालेली ज्ञानज्योत त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. एका पणतीने दुसरी पणती प्रज्वलित करून सर्व अंधकाररूपी अज्ञानाचा नाश करून ज्ञानाच्या स्वच्छ, नितळ प्रकाशात सर्वसामान्याचे जीवन उजळून टाकण्याचे स्वप्न ज्योतिरावांनी पाहिले. त्याची सुरूवात पत्नी

सावित्री व बहिण सगुणा यांच्या माध्यमातून केली. शेतामध्ये आंब्याच्या झाडाखाली धूळपाटीवर ज्योतिबा त्या दोघींना शिकवू लागले. कर्ता सुधारक आपल्या कार्याची सुरूवात स्वतःच्या कुटुंबापासूनच करतो, याचा वस्तुपाठ ज्योतिबांनी घालून दिला. अशा प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणास प्रारंभ केल्यानंतर दोघींनी शिक्षणात चांगली प्रगती केली. नॉर्मल स्कूलच्या प्रमुख मिचेल बाईंनी या दोघींची परीक्षा घेतली, त्यामध्ये इतिहास, भूगोल, गणित व इतर विषयात दोघी पास झाल्या. लहानपणी वाचलेले येशूचे पुस्तक प्रेरणादायी ठरले. त्या पुस्तकातील मानवता धर्म या बाबीचा त्यांच्यावर परिणाम झाला. स्कॉटीश मिशन शाळेतील मिशनरी लोकांच्या शिकवणुकीचा, कार्याचा प्रभाव सावित्रीबाईवर पडला, त्याच वेळी ज्योतिबा इंग्रजी 7 वी पास झाले.

• ***व्यवस्थेला सुरूंग** :–*

खडतर स्थितीत शिक्षण पूर्ण केल्यानंतर आणि मानवतावादी मूल्ये अंगिकारल्यावर समाजाच्या उन्नतीसाठी धडपडणाऱ्या फुले दांपत्यांनी 1 जानेवारी 1848 रोजीच्या पुण्याच्या कसब्यातील भिडे वाड्यात मुलींची शाळा काढली. शाळेत सावित्रीबाई धर्म, नीती, भटगिरी आणि अंधश्रध्दा नष्ट करण्याचा विडा उचलला. तात्याराव भिडे हे ब्राम्हण गृहस्थ ज्योतिबांचे खास मित्र त्यांनी आपला वाडा व दरमहा 5 रूपये देणगी आणि प्राथमिक शिक्षणाकरीता 101 रूपयांची देणगी दिली. फुले दांपत्याच्या या कृतीमुळे धर्ममार्तंड प्रथम संतापले आणि प्रचंड थयथयाट केला. परंतु या दांपत्यांने अथकपणे ज्ञानदानाचे कार्य चालू ठेवले. त्यानंतर सनातन्यांनी 'भ्रष्टाचार झाला, धर्म बुडाला' अशी बोंब मारायला सुरूवात केली. अशा कोल्हे कुईकडे फुले दांपत्यांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे सनातन्यांनी आपली चाल बदलून शेण, दगड, गोटे फेकून मारणे व आचकट, विचकट बोलणे सुरू केले. इतकेच नाही तर गुंडाकरवी त्रास देणे सुरू केले. सावित्रीबाईनी न डगमगता गुंडाच्या थोबाडीत लगावली आणि सर्व अडथळे पार करीत आपल्या ध्येयाकडे आत्मविश्वासाने वाटचाल चालू ठेवली.

• ***इंग्रजी राजवटीतील कार्य** :–*

इ. स. 1848 साल म्हणजे डलहौसीची कारकिर्द. भारत देशाला गतिमान करण्यासाठी डलहौसीने पोस्ट, रेल्वे आणि शिक्षण क्षेत्रात सुधारणा केल्या. शैक्षणिक संस्थांना आर्थिक सहाय्य दिले. फुले दांपत्यांनी पुणे व पुण्याच्या परिसरामध्ये 18 शाळा काढल्या. सावित्री–सगुणा यांनी विनावेतन शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्याचवेळी प्रगत समजल्या जाणाऱ्या इंग्लंड, फ्रान्स या देशात मानवी हक्काबद्दल लढा चालू होता आणि आपल्या देशात स्त्री–शुद्रांना शिक्षणात सहभागी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य फुले कुटुंबायांने चालू ठेवले होते. त्यांनी चालविलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेत 6 पैकी 4 ब्राम्हण, एक मराठा व एक धनगर अशा मुलींनी प्रवेश घेतला.

फुले दांपत्यांच्या पूर्वी इंग्रजांचे अंमलाखाली मिशनरी लोकांनी 1829 मध्ये शाळा चालविण्याचा पहिला प्रयत्न केला. मिसेस वुईल्सन यांनी 1830 मध्ये मुलींसाठीची शाळा काढली. 8 मुलींनी प्रवेश घेतला परंतु 2 वर्षात शाळा बंद पडली. त्यानंतर मोडक नावाच्या गृहस्थाने महारवाड्यात मुलींची शाळा काढली पण प्रतिसादाअभावी शाळा बंद पडली. 1844 मध्ये चर्च ऑफ स्कॉटलंड मिशनने मंगळवार पेठेत मुलींची शाळा काढली. युरोपिय शिक्षिका आणि साधन सामग्रीची सर्व सोय केली. ही देखील शाळा चार वर्षात बंद पडली. त्याचवेळी सावित्रीबाईंनी 15 मे 1848 साली महारवाड्यात मुलां–मुलींकरीता शाळा काढली. त्यांना समाजाची साथ मिळाली. लहुजी मांग आणि राणबा महार यांनी लोकांची समजूत घालून मुलांना शाळेत पाठविण्यास प्रवृत्त केले. सावित्रीबाईची कर्तव्यनिष्ठा व नीतिधैर्य विचलित होणारे नव्हते, त्यामुळे शाळा यशस्वीपणे सुरू राहिली.

दूरदृष्टीच्या फुले दांपत्याच्या डोक्यात नवीन विचार घोंगावू लागले. त्यामधून एक नॉर्मल ट्रेनिंग स्कूल काढले, यामधील पहिली विद्यार्थीनी फातिमा शेख होती. मुस्लिम समाजातील फातिमा शेख या भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षक असाव्यात. त्यानंतर सावित्री – फातिमा यांनी बहुजन विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम शास्त्रशुध्द केले. याची दखल 'पुना ऑब्जर्व्हर' या नियतकालिकाने घेतली आणि कार्याविषयी असे मत व्यक्त केले की, सरकारी शाळेतील विद्यार्थी संख्येपेक्षा सावित्रीबाईच्या शाळेतील विद्यार्थी संख्या दहा पट होती आणि जर अशीच अवस्था राहिली तर सरकारी शाळेतील मुलींपेक्षा सावित्रीबाईंच्या शाळेतील मुली वरचढ होतील व परीक्षेत मोठा विजय मिळवतील" ही बोलकी प्रतिक्रिया सावित्री–फातिमांच्या कार्याची पोच आहे असेच वाटते. तत्कालीन बोर्ड ऑफ एज्युकेशनचे सर ऑस्र्फीन पेरी प्रेसिडेंट होते. सावित्री – ज्योतिबाचे कार्य पाहून त्यांनी मुंबई सरकारला सावित्रीबाई – ज्योतिबांचा सत्कार करून गौरव करण्याविषयी कळविले. त्याप्रमाणे 16 नोव्हेंबर 1853 ला मेजर कॅन्डी यांच्या हस्ते महावस्त्र देऊन दोघांचा जाहीर सत्कार करण्यात आला. पुण्याचे

कलेक्टर जोन्सच्या पत्नीने शाळेतील मुलींना पुस्तके, साड्या व बक्षिसे दिली.

फुले दांपत्यांचे अफाट कार्य पाहून मामा परमानंद भारावून म्हणतात, "एका मराठ्याने आपल्या पत्नीस शिकवून तिच्याकरवी ब्राम्हणाच्या मुलींना शिकविण्याचा त्यांच्या बालेकिल्ल्यात केलेला प्रयत्न म्हणजे मोठे धाडसाचे काम आहे. परंतु त्यांच्या बालेकिल्ल्यात राहून महार, मांग यांच्यासाठी शाळा उघडून आणि त्यांना समाजाचे घटक बनविणे म्हणजे सिंहाची आयाळ त्याच्या गुहेतच जाऊन उपटण्यासारखी गोष्ट आहे". म्हणजे सावित्री – ज्योतिरावांनी सुरू केलेले कार्य अंतरउर्मीतून केलेले आहे. समाज परिवर्तनाची ओढ त्यांच्या मेंदूत रूजली होती. हजारो वर्षांचा अज्ञानाचा अंधकार भेदण्यासाठी शिक्षणासारखे दुसरे अमोघ साधन नाही, याची खात्री पटल्यानंतर या दांपत्याने लोकटिकेकडे दुर्लक्ष करून शैक्षणिक कार्यात ज्या उत्साहाने काम केले त्याच प्रमाणे त्यांनी सामाजिक प्रश्नाची उकल करण्यास प्रारंभ केला.

## • *सामाजिक कार्य :–*

तत्कालीन सामाजिक स्थितीचा विचार केला तर दलितांची स्थिती पशू समान होती. अज्ञान, अंधश्रध्दा, भूकबळी, व्यसनाधिनता, बालविवाह, जरठ विवाह, केशवपन, सती आणि विधवांच्या समस्या, अशा स्वरूपाची सामाजिक स्थिती होती. दलितांना सत्ता, संपत्ती व सन्मान यापासून परंपरेने वंचित ठेवले होते आणि हाच वर्ग फुले दांपत्याच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचा केंद्र बिंदू ठरला.

सावित्रीबाईंच्या शाळेतील अकरा वर्षाच्या मांग समाजातील 'मुक्ता' या विद्यार्थीनीने निबंध लिहिला. हा निबंध सरकारी अहवालात त्यावेळी प्रसिध्द झाला. या निबंधात मुक्ताने मांडलेले विचार समाज स्थितीचे मार्मिकपणे निरीक्षण करते असे वाचावयास मिळते. मुक्ता लिहिते "इंग्रज लोकांमुळे उच्चवर्णियांच्या जुलूमापासून आम्ही मुक्त झालो. काही ब्राम्हण मंडळीही सहकार्य करतात". पुढे ती लिहिते, "जर वेद ब्राम्हणाचे आहेत तर वेदाप्रमाणे वर्तन करणे हा ब्राम्हणांचा धर्म आहे. जर आम्हास धर्मासंबंधी पुस्तक पाहण्याची मोकळीक नाही तर आम्ही धर्मरहित आहो, असे साफ दिसते की नाही. बरे ! सनातनी उच्चवर्णियांच्या जाचाची कहाणी ती अशी विषद करते. इमारतीच्या पायात आम्हास तेल पाजून व शेंदूर फासून पुरण्याचा व आमचा निर्वंष करण्याचा क्रम चालविला होता. त्यासमयी महार अथवा मांग यातून कोणी तालीमखान्यापुढून गेला असता गुलटेकडीच्या मैदानात त्याच्या शिराचा चेंडू व तलवारीचा दांडू करून खेळत होते. अशी जर मोठ्या सोवळ्या राजाच्या दारावरून जाण्याची बंदी तर विद्या शिकण्याची मोकळीक कोठून मिळणार ?"

शिक्षणाचे सामर्थ्य जाणविल्यामुळे व समाज परिवर्तनाचे हे अमोघ साधन असल्याची खात्री पटल्यानंतर सावित्रीबाई लिहतात.

" शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा ।
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हारते पाहा ।। "

समाज प्रवाहा विरूध्द वाटचाल करणे सोपी गोष्ट नाही, सर्वच आघाड्यावर लढा देण्याची तयारी ठेवावी लागते, याचे भान फुले दांपत्यास होते. त्यामुळे त्यांनी सामाजिक प्रश्नांची दाहकता लक्षात घेऊन उपाययोजनेला सुरूवात केली. विधवांचे पुनर्विवाह केले, परितक्त्या स्त्रियांना आधार दिला, विधवांच्या मुलांकरीता बालगृहे काढली. साऱ्या पुण्यनगरीत "कोणीही आमच्या घरी येऊन बाळंत व्हावे आणि जन्मलेल्या मुलाला घेऊन जावे अथवा ठेवून जावे. त्याचे संगोपन आम्ही करू", अशा मजकूराच्या पाट्या लावल्या. काशीबाई या विधवेला सहारा दिला, तिचा यशवंत नावाचा मुलगा दत्तक घेऊन त्याला वारसा चालविण्याची प्रतिष्ठा दिली.

असाच एक अभिनव उपक्रम सावित्रीबाई व ज्योतिबांनी राबविला. सर्व केस कापणाऱ्या न्हाव्यांची केशवपन बंद करण्यासाठी परिषद घेतली आणि त्यामध्ये असे ठरविण्यात आले की, कोणत्याही न्हाव्याने ब्राम्हण विधवा स्त्रिचे केशवपन करू नये, पाहिजे तर ब्राम्हणांनी त्यांच्या विधवांचे केशवपन करावे. त्याचप्रमाणे विधवा विवाह संस्था, बालहत्या प्रतिबंधगृह, अनाथ बालगृह याचा फायदा असंख्य बालविधवांनी घेतला. त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी उद्योग सुरू केले. सर्वप्रथम बचतगटाची संकल्पना मांडून प्रत्यक्षात कृतीत उतरवून विधवांना स्वावलंबी बनविण्याचे क्रांतिकारक कार्य सावित्रीमाईंनी केले. त्यामुळे बचतगटाची जन्मदात्री म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे विधवांना स्वाभिमानाने जगता येऊ लागले, त्यामुळे विधवांचे परावलंबित्व संपले. याची दखल घेऊन 1871 मध्ये 'ज्ञानप्रकाश' ने फेब्रुवारीच्या अंकात असे लिहले. "एका परोपकारी सद्गृहस्थाने गरोदर स्त्रिया आणि त्यांची मुले यांना आश्रय देण्यासाठी एक स्वतंत्र घर बांधले. ही संस्था काढून ब्राम्हण विधवांची अब्रू वाचविली अन् त्यांना समाजाच्या छळापासून वाचविले".

1896 मध्ये महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला. यावेळी अन्न, पाण्याविना तडफडून दोन कोटी लोक मरण पावले. सावित्रीबाईनी या दुष्काळाचे मर्मस्पर्शी वर्णन करून इंग्रज सरकारला विनंती केली ती अशी,

झाडे झुडपे वाळून जाती । उजाड झाले सर्व देश ।।
गुरे मरती रानावनात । माणसे मरती घरात ।।
त्याची प्रेते कुजुनी जाती । जिकडे तिकडे दुर्गंधी ।।
दुष्काळही पापाची गती । शूद्रादी–अतिशूद्र भोगती ।।
चमचमीत खाऊन वदती । पुण्यातले पुण्यवान ।।

फुले दांपत्यांनी कृतीशीलता जोपासली. दलितांना पाणी मिळत नव्हते. त्यावेळी त्यांनी आपला पाण्याचा हौद खुला केला. त्याचप्रमाणे ज्योतिरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

• ***साहित्यिक सावित्रीबाई :–***

ज्योतिरावांचे निधनानंतर सावित्रीबाईनी समाज कार्याची धुरा स्वतः सांभाळली आणि साहित्य निर्मितीस प्रारंभ केला. हे सर्व साहित्य बावनकशी सोन्यासारखे आहे. 'बावनकशी सुबोध रत्नाकर', 'काव्यफुले' हे ग्रंथ प्रसिध्द झाले. यामध्ये शिक्षणाचे महत्त्व विशद करताना त्या म्हणतात.

" विद्या हे धन आहे रे श्रेष्ठ साऱ्या धनाहून ।
तिचा साठा जयापाशी तो ज्ञानी मानती जन ।।"

आपल्या पुरोगामीपणाचा दाखला देताना त्यांच्या पुढील काव्यपंक्ती याचीच साक्ष देतात.

" शूद्र–अतिशूद्र दुःख निवाराया ।
इंग्रजी शिकाया संधी आली ।।
इंग्रजी शिकूनी जातीभेद मोडा ।
भटजी भारूडा फेकुनिया ।। "

• ***निश्कर्ष :–***

1 बहुजन, दलित, पिचलेल्या व आर्थिकदृष्ट्या दुर्बलांच्या शिक्षणाची भगिरथी बनण्याचे श्रेय सावित्रीमाईंना देता येईल.
2 बोलघेवडे बनण्यापेक्षा कृतीशील, नीतिशील, धैर्यवान समाज सुधारकांमध्ये सावित्रीमाईंचे स्थान सर्वोच्चपदी आहे.
3 सर्वप्रथम बचतगटाची संकल्पना मांडून प्रत्यक्षात कृतीत उतरवून विधवांना स्वावलंबी बनविण्याचे क्रांतिकारक कार्य सावित्रीमाईंनी केले. त्यामुळे बचतगटाची जन्मदात्री म्हटल्यास वावगे ठरणार नाही.
4 विधवा, परितक्त्यांना सन्मानाने जीवन जगता यावे असे कार्य करण्याचा बहुमान सावित्रीमाईंना जातो.

***संदर्भ ग्रंथ***

1 भारतीय मातृकथा – खंड चौथा
2 महात्मा फुले समग्र वाङ्मय – फडके य. दि., धनंजय कीर.
3 काव्य फुले – सावित्रीबाई फुले
4 स्त्री–पुरूष समानता – ताराबाई शिंदे
5 स्त्रीवादी साहित्य – अश्विनी धोंगडे